# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२४**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) येथील वसतीगृहाचे बांधकाम करण्याबाबत

**(१) ५०८०६ (२४-०१-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) येथे ) भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त मागासवर्गीय मुलींसाठी नवीन वसतीगृह मंजूर करण्यात आले असून वसतीगृहाच्या बांधकामासाठी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चंद्रपूर यांनी २० कोटी रूपयांचा प्रस्ताव प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान पाठविण्यात आलेला आहे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार वसतीगृह इमारत बांधकामासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०४-२०२४) :** (१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी येथे मागासवर्गीय मुलींसाठी नवीन वसतिगृह मंजूर करण्यात आले आहे. सदर प्रस्तावास विभागाच्या दि.६.३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केज (जि.बीड) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांच्या शासकीय वसतीगृहास निधी उपलब्ध करण्याबाबत

**(२) ५२०३८ (२५-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि.बीड) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृहाच्या इमारतीची दुरवस्था झाली असून सोयी सुविधा नसल्यामुळे व सदरील वसतीगृहामध्ये विदयार्थ्यांना सायकल पार्कींग करतांना विज पुरवठा खंडीत झाल्यानंतर अडचण येऊ नये म्हणुन इनव्हर्टरची आवश्यकता असल्याने निधी उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. सामाजिक न्याय मंत्री, प्रधान सचिव व आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्याकडे दिनांक १९ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०४-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) वसतीगृह इमारतीचे दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक त्रुटीपूर्तता करुन प्राप्त करुन घेऊन निधी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाड (जि.रायगड) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविदयालयाच्या इमारतीची दुरुस्तीच्या कामाकरीता निधी प्रलंबित असल्याबाबत**

**(३) ५३४८८ (२५-०१-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड (जि.रायगड) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविदयालयाच्या इमारतीची अत्यंत दुरवस्था झालेली असल्याचे माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे त्यानुसार उक्त इमारतीच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून त्यानुषंगाने कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात बार्टीने उद्योजक घडविण्यासाठी कार्यक्रम हाती घेतल्याबाबत**

**(४) ५५४०० (२९-०१-२०२३). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुसूचित वंचित दुर्बल घटकांतील लोकांच्या सर्वांगीण विकासासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेने प्रत्येक गावात युवा गट स्थापन करुन प्रशिक्षण व अर्थसहाय्य देत ५० हजार उद्योजक घडविण्याचा विशेष उपक्रम हाती घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासाठीचे बेंचमार्के सर्व्हेक्षण कधीपासून हाती घेण्यात येणार आहे, तसेच यासंदर्भात माहिती उपक्रम शासनाच्या महाज्योती व सारथी या संस्थानाही हाती घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०४-२०२४) :** (१) खरे आहे,
बार्टीमार्फत राज्यातील अनु वंचित दुर्बल घटकाच्या युवक युवतींना उद्योजक बनवण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण देण्यासाठी MCED मार्फत प्रशिक्षण देण्यात येत आहे. यामध्ये व्यक्तीश: कोणतेही अर्थसहाय्य बार्टी मार्फत दिले जात नाही.
(२) बार्टी मार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकासाबाबत बेंचमार्क सर्वेक्षण हा संशोधन प्रकल्प सुरु असुन या अंतर्गत अनुसूचित जाती घटकाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकासाबाबत पथदर्शी सर्वेक्षण करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## भीमा कोरेगाव (जि.पुणे) येथे विजयस्तंभ परिसरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याबाबत

**(५) ५६५७९ (२६-०४-२०२३). अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भीमा कोरेगाव (जि.पुणे) येथील ऐतिहासिक विजयस्तंभास अभिवादन करण्यासाठी दिनांक १ जानेवारीला देशभरातून दरवर्षी लाखो आंबेडकरी अनुयायी भेट देत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विजयस्तंभाचे भव्य स्मारक उभारण्यासाठी या परिसरातील १०० एकर जमीन राज्य सरकारने संपादित करावी अशी आग्रही मागणी अनेक आंबेडकरी संघटनांकडून होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्मारकासाठी सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पात शासन भरीव निधीची तरतूद करणार आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने भीमा कोरेगाव या परिसरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०४-२०२४) :** १) होय.

(२), (३) व (४) प्रकरण न्यायप्रविष्ठ असून मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील रमाई आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत उद्दीष्ट पूर्ण करण्याची केलेली मागणी

**(६) ५९६७४ (२५-०४-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील रमाई आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत सन २०२१-२०२२ करीता उद्दीष्ट पुर्ण करण्याची मागणी सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग, कोल्हापूर यांनी प्रादेशीक उपायुक्त, पुणे यांचेकडे दिनांक ६ सप्टेंबर,२०२२ रोजी लेखी निवेदनाव्दारे केल्याचे माहे जानेवारी,२०२२ वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाकरीता कोल्हापूर जिल्ह्यासाठी १६२० इतके उद्दीष्ट प्राप्त झाले असून सन २०२२ करीता एकूण मंजूर घरांची संख्या १९०५ असून सन २०२१-२०२२ करीता ३३४ इतक्या घरकुलांना मंजूरी देण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) सन २०२३-२४ करिता रमाई आवास योजनेंतर्गत एकूण १.५०,००० लाख इतके उद्दिष्ट मंजूर करण्यात आले आहे. याबाबत जिल्हानिहाय उद्दिष्टाचे वितरण आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ठ झालेल्या गावातील कर आकारणीबाबत**

**(७) ५९७८९ (२८-०४-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेत १० वर्षापूर्वी नव्याने समाविष्ट झालेल्या गावात रस्ते, पाणी, ड्रेनेज, आरोग्य इ. मुलभूत सुविधा योग्या प्रमाणात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे येथील जुन्या महानगरपालिका हद्दीतील परिसराच्या तुलनेत नवीन हद्दीतील मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देत नाही तोपर्यंत येथे जुन्या ग्रामपंचायत दराने कर आकारणी करण्यात यावी, अशी लेखी मागणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०४-२०२४) :** (१) पुणे महानगरपालिकेत १० वर्षापूर्वी नव्याने समाविष्ट झालेल्या गावात रस्ते, पाणी, ड्रेनेज, आरोग्य इ. मुलभूत सुविधा देण्याचा प्रयत्न महानगरपालिका करीत आहे. तथापि, निधीच्या कमतरते अभावी नवीन कामे करण्यावर मर्यादा येत असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) मा. विधानसभा सदस्यांबरोबर बैठक घेऊन सर्व विषयांबाबत चर्चा करुन मार्ग काढण्याबाबत मा.मंत्री (नगर विकास) यांनी दि. २०.१०.२०२१ रोजी झालेल्या बैठकीत आयुक्त पुणे महानगरपालिका यांना सूचित केले असून सदर बैठकीचे इतिवृत्त दि. ०३.०३.२०२३ च्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जुन्नर (जि.सातारा) तालुक्यातील मंजूर निवासी शाळेचे काम सुरु करण्याबाबत**

**(८) ५९९३३ (२८-०४-२०२३). श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागातंर्गत दिनांक १ जून २००६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात अनुसूचित जाती व नवबौद्धांच्या मुलांमुलींसाठी प्रत्येक तालुक्यात एक अशा ३५३ मंजूर शासकीय निवासी शाळांपैकी सन २००७-२००८ या वर्षापासून पहिल्या टप्प्यातील शासनाने १०० निवासी शाळांच्या यादीतील १८६ व्या क्रमांकावर असलेल्या जुन्नर तालुक्यातील मान्यता दिलेल्या निवासी शाळेस १५ वर्षे इतका कालावधी होऊनही अद्याप सदरहू शाळेसाठी निधी उपलब्ध करुन बांधकाम सुरु करण्यात आले नसल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पहिल्या टप्प्यातील मान्यता दिलेल्या १०० पैकी जुन्नर (जि.सातारा) तालुक्यात निवासी शाळा बांधण्याबाबतचा प्रस्ताव नमुद असूनही उक्त निवासी शाळेचे बांधकाम सुरु करण्यास विलंब झाल्याचे निदर्शनास आले असून याबाबत सद्य:स्थिती काय आहेत,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार जुन्नर तालुक्यातील प्रलंबित निवासी शाळेचे बांधकाम तात्काळ सुरु करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सामाजिक न्याय विभागाच्या आदेशातील जाचक अटीमुळे मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीचा पुनर्विकास प्रलंबित असल्याबाबत

**(९) ६०४३७ (२५-०४-२०२३). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये १९७८ पासून मागसवर्गीय गृहनिर्माण संस्थामध्ये अनेक खरेदी-विक्री व्यवहार झाले असून हे सर्व व्यवहार म्हाडा, स्टॅम्पडयुटी, रजिस्ट्रेशन कार्यालयातून नोंदणी करून झाले, अभिहस्तांतरण प्रकियाही नियमानुसार पार पाडली या गृहनिर्माण संस्थांचा सर्व कारभार महाराष्ट्र को. ऑप. हौ. सो. ॲक्ट १९६० नुसार चालत असतांना सामाजिक न्याय विभागाने २००९ मध्ये शासन आदेश काढून त्यात २६ जाचक अटींचा समावेश केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त जाचक अटींमुळे गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीचा पुनर्विकास प्रलंबित असून सदर जाचक अटी रद्द करण्याची मागणी होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सन २००९ मध्ये काढण्यात आलेल्या शासन आदेशाच्या २६ जाचक अटी रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०४-२०२४) :** (१), (२) व (३) मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासासाठी युध्दोत्तर पुर्नवर्सन योजनेंतर्गत (PWR-२१९) सामाजिक न्याय विभागाच्या दि.३१.०५.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारीत धोरण निश्चित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात नवोदय विद्यालयाच्या धर्तीवर सुरु असलेल्या निवासी शाळांमध्ये सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्याबाबत

**(१०) ६०८७३ (२५-०४-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील समाजकल्याण विभागाने प्रत्येक तालुक्यात अनुसूचित जातीमधील गोरगरीबांच्या मुला-मुलींना उत्तम शिक्षण देता यावे यासाठी नवोदय विद्यालयाच्या धर्तीवर सुरु असलेल्या निवासी शाळांमध्ये दहा वर्षे उलटूनही सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्यात आलेला नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १३ एप्रिल, २०११ रोजी प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे राज्यात ३५३ शासकीय निवासी शाळा समाज कल्याण विभागातंर्गत येत असुन यापैकी १०० शाळा पहिल्या टप्प्यात सुरु करण्यात आल्या या शाळांमध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द विद्यार्थ्याच्या शिक्षणाची सोय करण्यात आली असून नवोदय विद्यालयाच्या धर्तीवर चालणाऱ्या शाळांमध्ये सीबीएसई अभ्यासक्रम राबविला जात नसल्याने विद्यार्थ्याची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०४-२०२४) :** (१) (२) सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द मुला-मुलींच्या शिक्षणासाठी ९३ शासकीय निवासी शाळा कार्यरत असून सदरील शाळा सद्यस्थितीत सेमी इंग्रजी माध्यमाच्या असून Maharashtra State Board of Secondary Education (एस.एस.सी.) बोर्ड अभ्यासक्रमानुसार कार्यरत आहेत. सदर शाळांमध्ये प्रायोगिक स्तरावर विभागवार एका शासकीय निवासी शाळांमध्ये CBSE अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### समाजकल्याण विभागाच्या निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा करण्याबाबत

**(११) ६०९७६ (२५-०४-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात समाजकल्याण विभागाच्या ९० निवासी शाळा असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शाळेतील विद्यार्थ्यांना मागील ३ वर्षापासून गणवेश पुरवठा करण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले त्यानुसार विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही कली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०४-२०२४) :** (१) सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द मुला-मुलींच्या शिक्षणासाठी ९३ शासकीय निवासी शाळा कार्यरत आहेत.
(२) सामाजिक न्याय विभागांतर्गत शासकीय निवासी शाळेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात कोविड-१९ चा प्रादुर्भावामुळे निवासी शाळा बंद असल्याने गणवेश पुरवठा करण्यात आलेला नाही. सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरू झाल्याने विद्यार्थ्यांना गणवेश खरेदी करण्यासाठी विहित रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आलेली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### कोल्हापूर शहरातील खासबाग मैदानाची दुरावस्था झाल्याबाबत

**(१२) ६११७२ (२७-०४-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहराचे वैभव असलेल्या व देशभर कुस्तीसाठी प्रसिद्ध असलेल्या खासबाग मैदान हे छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील असून त्यास ऐतिहासिक वारसा लाभलेला असतांना, सद्यस्थितीत सदर मैदानाची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कुस्ती मैदानात अवास्तव वाढलेल्या वृक्षांची छाटणी करणे , मैदान परिसरात काँक्रीटीकरण न करता मुरूम मातीची लेवल करणे, यासह कुस्तीगीरांना व प्रेक्षकांना मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या मागणीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व विविध संघटना यांनी स्थानिक प्रशासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पहाणी करण्यात आली आहे काय, पहाणी अंती काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर मैदानाचे सुशोभीकरण व आधुनिकीकरण करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे काय, तद्अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोईसुविधांचा विकास या योजनेअंतर्गत केशवराव भोसले नाटयगृह व राजर्षी शाहू खासबाग कुस्ती मैदान जतन व संवर्धन करणे दुसरा टप्प्यासाठी रु.१ कोटी निधी प्राप्त झाला असून सदर कामाची निविदा प्रक्रिया राबवून कार्यादेश देण्यात आला आहे. यामध्ये कुस्तीपटूंच्या मागणीनुसार अस्तित्वातील खासबाग येथील प्रवेश व इमारत जतन संवर्धन करणे, कुस्तीपटूंसाठी चेंजिग रुम, प्रसाधनगृह बांधणे इ.कामे सुरु आहेत.
तसेच राजर्षी शाहू खासबाग मैदान येथील दक्षिण पूर्वेकडील संरक्षण तटबंदीचे बांधकाम करण्यासाठी महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत सन २०२३-२४ मध्ये रु.४८,९३,६१०/- इतक्या निधीच्या कामास प्रशासकीय मान्यता मिळाली असून निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगांव (जि.नाशिक) शहरात लागलेल्या आगीच्या घटना रोखण्याबाबत

**(१३) ६२०९७ (२४-०४-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरात सन २०२२ या वर्षात ४१० आगीच्या घटना घडल्या असून त्यामध्ये कोटयावधी रुपयांच्या मालमत्तेचे नुकसान झाले असून त्यात १८ जणांचा आपले प्राण गमवावे लागले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरात आगीचे वाढते प्रमाण पाहता शासन फायर ऑडिटबाबत उदासिन असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरातील आगीच्या घटना रोखण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०४-२०२४) :** (१) मालेगाव हद्दीत व हद्दीबाहेर सन २०२२ या वर्षात २९७ आगीच्या घटना घडलेल्या असुन अग्निशमन कार्याच्या वेळी आगीच्या घटनेत कोणत्याही प्रकारची जिवीतहानी झालेली नाही.
(२) नाही.
महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व नियम २००९ अन्वये अग्निलेखा परीक्षण करणेबाबत स्थानिक मराठी व उर्दु वृत्तपत्रात वेळोवेळी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत
(३) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ व नियम २००९ अन्वये स्थानिक वृत्तपत्रात जाहिर नोटिस प्रसिद्ध करण्यात येवुन अधिनियमाच्या कलम ११ (१) नुसार कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील रमाई आवास योजना व शबरी आवास योजनेतील घरकूलांचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१४) ६३९४७ (२५-०४-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यातील अडीच हजार घरकूलांचे काम अद्यापही अपूर्ण असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) तसेच तालुक्यातील रमाई आवास योजना व शबरी आवास योजनेतील घरकूलांचे काम अपूर्णावस्थेत असल्यांचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार घरकूलांचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०४-२०२४) :** (१), (२) व (३) केंद्र व राज्य पुरस्कृत विविध ग्रमीण आवास योजनेतंर्गत मेहकर तालुक्यात ५२५३ मंजुर घरकुले असून ३१६२ घरकुले पूर्ण केली असुन उर्वरित घरकुले प्रगती पथावर आहेत.

रमाई आवस योजना (ग्रामीण) या योजनेची संपूर्ण अंमलबजावणी, संनियंत्रण व निधीचे व्यवस्थापन राज्यस्तरावरील संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, मुंबई या कक्षामार्फत सन २०१६-१७ पासून केला जात आहे. त्यानुषंगाने सदर कक्षामार्फत घरकुले पूर्ण करण्याकरिता राज्यस्तरावरुन वेळोवेळी आढावा बैठकीव्दारे तसेच प्रत्यक्ष भेटी देऊन पाठपुरावा करण्यात येतो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मार्केट यार्ड ट्रक टर्मिनल (जि.पुणे) येथील सुलभ स्वच्छतागृहाचे थकीत भाडे वसूल करण्याबाबत

**(१५) ६५९०६ (१२-०९-२०२३). श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील शिवनेरी पथावरील मुख्य रस्त्यालगत असलेले मार्केट यार्ड ट्रक टर्मिनल येथील सुलभ स्वच्छतागृह महानगरपालिकेने अडीच वर्षापासून भाडेतत्वावर दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या स्वच्छतागृहाच्या ठेकेदार एजन्सीने मागील ६ महिन्यांपासून महानगरपालिकेचे भाडे थकविलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन येथील एजन्सीकडून थकीत भाडेवसूली करण्यासह या स्वच्छतागृहाची पुन्हा नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०४-२०२४) :** (१) होय.

सन २०१५ ते २०२० पर्यंत सदर स्वच्छतागृह टेंडरव्दारे भाडेतत्वावर देण्यात आले होते. टेंडरमधील अटी व शर्तीनुसार ५ वर्षे मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
(२) नाही. १४ जून २०२३ पर्यंतचे भाडे भरून घेण्यात आले आहे.
(३) सदर एजन्सी कडून कोणतेही भाडे थकीत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरालगतच्या नाल्यावरील अतिक्रमणामुळे पुराचा धोका निर्माण झाल्याबाबत

**(१६) ६६८०२ (३१-०८-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरालगतच्या हद्दीतील फुरसुंगी, वडकी, उरुळी देवाची, औताडे-हांडेवाडी, वडाचीवाडी, परिसरात ओढ्या नाल्यांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झालेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील सर्व ठिकाणी सरकारी गायरान, वनजमिनीवर लोकांनी अतिक्रमण करून नैसर्गिक ओढे नाले भराव टाकून बुजवले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सर्व ठिकाणी मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे केल्यामुळे येणाऱ्या या भागाला पुराचा धोका निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तदनुसार उक्त ठिकाणची अतिक्रमणे काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०४-२०२४) :** (१) ऊरळी देवाची व फुरसुंगी, वडकी, औताडे- हांडेवाडी, परिसरातील अस्तित्वातील नाल्याची साफसफाई करताना प्रवाहात नाल्यामध्ये अनधिकृत बांधकामे आढळून आलेली नाहीत.

(२) पुणे शहराच्या हद्दीतील सन २०१७ व सन २०२१ मध्ये समाविष्ट गावांमधील गायरान जमिनीच्या देखभाल दुरूस्तीसाठी ७/१२ उताऱ्यावर इतर हक्कामध्ये संबंधित ग्रामपंचायतीच्या देखभाली करीता नोंदी आहे. तसेच भोगवटादार सदरी महाराष्ट्र शासन, सरकारी गायरान व ग्रामपंचायत अशा नोंदी आहेत. या जागांवर मनपा हद्दीतील समावेशापुर्वीपासून अतिक्रमणे आहेत, ही बाब खरी आहे. गायरान जागांचे पुणे महानगरपालिकेकडे प्रत्यक्ष हस्तांतरण झालेले नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मागासवगीय सहकारी गृहनिर्माण योजनेतील इमारतीचे पुनर्विकास धोरण जाहिर करण्याचा निर्णय

**(१७) ६७८७३ (०३-०९-२०२३). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवगीय सहकारी गृहनिर्माण योजनेतील इमारतीचे पुनर्विकास धोरण जाहिर करण्याचा निर्णय दिनांक १६ मे,२०२३ रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोरणाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर धोरणाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०४-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) विभागाच्या दि.३१.०५.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण योजना (Post War Rehabilitation-२१९) या योजनेंतर्गत इमारतींच्या पुर्नविकासाचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## ठाणे जिल्ह्यातील भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेत भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्याची आयुक्त म्हणून नियुक्ती करण्याबाबत

**(१८) ६९०५८ (३१-०८-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) शहर महानगरपालिका ही “ड” वर्ग दर्जाची महानगरपालिका असून, सदर महानगरपालिकेत भारत सरकारच्या कार्मिक आणि प्रशिक्षण विभाग मंत्रालयाच्या दिनांक १५ जून, २०१८ च्या अधिसूचनेप्रमाणे भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका भारतीय प्रशासकीय सेवेतील (IAS) अधिकाऱ्यांसाठी निश्चित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेत अन्य राज्य संवर्गातील अधिकाऱ्यांची आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे, त्यामुळे भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेचा कार्यभार सुरळीत चालत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेत भारतीय प्रशासकीय सेवेतील (IAS) अधिकाऱ्याची आयुक्त म्हणून नियुक्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री व अप्पर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांना दिनांक १७ जून, २०१३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०५-२०२४) :** (१) होय.

(२) भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेवर राज्य संवर्गातील अधिकाऱ्यांची आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आल्याने महानगरपालिकेच्या कामकाजावर विपरित परिणाम झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३), (४) व (५) होय. भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेत भाप्रसे अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास विनंती केली आहे. सदर विनंतीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## नागपूर महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण विकास योजना डी.पी. प्लॅन अंतर्गत रस्त्याचे बांधकाम करण्याबाबत

**(१९) ७०२१२ (३१-०८-२०२३). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण विकास योजना डी.पी. प्लॅन अंतर्गत प्रस्तुत डी.पी. रस्त्याचे बांधकाम करून देण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तुत डी.पी. रोडचे बांधकाम करून देण्याची मागणी विविध स्तरावरून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदर रस्त्याचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०५-२०२४) :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय, हे ही खरे आहे.

(३) नगर विकास विभागाने मंजूर केलेल्या मौजा सुमठाना–कोतेवाडा-सोंडापार-जामठा-परसोडी व खडका-किरमीटी-शिवमडका-पांजरी या सुधार योजनामध्ये ३६.०० मी. रूंद विकास योजना रस्ता प्रस्तावित केला आहे. सदर रस्त्याची

एकूण लांबी ९.३४ कि.मी. असून यापैकी १.०७६ कि.मी. लांबीमधील जमिनधारकांनी रस्त्याकरीता लागणारी जागा नागपूर सुधार प्रन्यासला हस्तांतरीत करण्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर केले आहे. शासनाने मंजूर केलेल्या सुधार योजनेतील रस्त्यांसाठी बाधित जागेबाबत जमिन धारकास जागेचा टी.डी.आर उपलब्ध होत नाही. सदर योजना रद्द करण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावरून सुरू आहे. सदर रस्त्याच्या उर्वरित लांबीमधील जमिन धारकांकडून रस्ता बांधकामाकरीता लागणारी जागा मूळ जमिन धारकांकडून नागपूर सुधार प्रन्यासला हस्तांतरीत झाल्यावर कामाचे अंदाजपत्रक तयार करून निधीच्या उपलब्धतेनुसार सदर रस्त्याचे बांधकाम नागपूर सुधार प्रन्यास यांचेमार्फत करण्यात येईल.
(४) विलंब झालेला नाही.

---

## खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे) येथील मुख्यमंत्री ग्राम सडक व संशोधन विकास योजनेच्या दर्जाहीन कामाबाबत

**(२०) ७१६३७ (०५-०३-२०२४). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकवासला (ता.हवेली, जि.पुणे) येथील मुख्यमंत्री ग्राम सडक व संशोधन विकास योजनेची सन २०२० ते माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान कामे निकृष्ठ दर्जाचे सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निविदा प्रक्रिया राबविताना पसंतीच्या कंत्राटदाराला कामे संगनमताने दिले जात असल्याने कामांचा दर्जा अतिशय सुमार असून कोट्यवधी रुपये खर्च करुन बांधलेले रस्ते मुदतपूर्व उखडले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या व सुरु असलेल्या कामांच्या पाहणीकरीता स्वत: लोकप्रतिनिधी म्हणून वारंवार विचारणा केली जात असता कारणे दाखवून प्रत्यक्ष पाहणीसाठी टाळाटाळ केली जात असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी संबंधित विभागाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे शासनाचे आर्थिक नुकसान होत असल्याने या विभागाच्या सन २०२० ते माहे ऑक्टोबर, २०२३ मधील सर्व कामांची शासनाच्या त्रयस्थ संस्थेकडून चौकशी करुन कारवाई करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-०५-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे नाही. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील कामांची ई-निविदा प्रक्रिया राबवून कंत्राटदाराची निवड करण्यात येते. तसेच योजनेंतर्गत प्रस्तावित असलेल्या रस्त्यांची गुणवत्ता तपासणी राज्य गुणवत्ता निरिक्षक व वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरिक्षक यांच्यामार्फत वेळोवेळी तपासणी करण्यात येते. तसेच आवश्यकतेनुसार दोष दायित्व कालावधीतील रस्त्यांवर संबधित कंत्राटदाराकडून दुरूस्ती करून घेण्यात येते.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील प्रादेशिक परिवहन कार्यालयांसाठी नेमलेल्या आर.सी. प्रिंटींग कंत्राटदाराकडून वसूल करावयाच्या दंडाच्या रकमेत झालेली अनियमितता

**(२१) ७१७१४ (०८-०२-२०२४). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये आर.सी. प्रिंटींगचे काम सन २०१७ पासून रोजमार्टा कंपनीला देण्यात आले असता आढळून आलेल्या त्रुटींच्या संदर्भात व कंपनीने करारानुसार काम न केल्याने कंत्राटात नमूद दरमहा दंडाच्या तरतुदीनुसार दरमहा एकूण किती दंड वसुल करण्यात आला आहे,
(२) असल्यास, दंडाच्या रक्कमेत कपात करण्याची व सदर कंपनीच्या कंत्राटाची मुदत संपल्यानंतरही वारंवार मुदतवाढ देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकरणी मा.परिवहन मंत्री यांनी कंत्राटाची मुदत संपल्यामुळे पुन्हा निविदा प्रक्रिया राबविण्याचे आदेश देऊनही मुदतवाढ देण्याचे प्रकार सुरुच राहिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेकायदेशीर मुदतवाढीसंदर्भात विभाग प्रमुखांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०५-२०२४) :** (१) आर. सी. प्रिटींगकरीता रोजमार्टा या कंपनीसोबत करार करण्यात आला असून आजपर्यंत एकूण रु. १२३६९६१६/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.
(२) व (३) कोरोना कालावधीत कार्यालय बंद असल्याकारणाने आकारण्यात आलेला दंड कमी करण्यात आलेला आहे. विभागामार्फत नवीन सेवापुरवठादार नियुक्त करणेकरीता निविदा प्रसिध्द करुन सेवापुरवठादार यांची नियुक्ती करण्यात आली होती. तथापि, सदर निविदा प्रक्रियेविरुध्द मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. ६७५०/२०२२ दाखल झाल्याने निविदा प्रक्रियेस विलंब झाला आहे. नागरिकांनी गैरसोय होऊ नये याकरीता जुने सेवापुरवठादार यांचे कालावधील प्रलंबित नोंदणी प्रमाणपत्र छपाई करणेकरीता मुदतवाढ देण्यात आली होती.
(४) व (५) अनुज्ञप्ती व नोंदणी प्रमाणपत्र छपाई करण्यासाठी विहित निविदाप्रक्रियेव्दारे मे.MCT यांची सेवा पुरवठादार म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, अनुज्ञप्ती व नोंदणी प्रमाणपत्र छपाईचे काम सुरु करण्यात आले आहे. तसेच, मे.MCT मार्फत सर्व प्रलंबित नोदंणी प्रमाणपत्रांचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

---

## पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) महानगरपालिका हद्दीतील सिडको अंतर्गत नियमित व सुरळीत पाणी पुरवठा करण्याबाबत

**(२२) ७१७२७ (०६-०२-२०२४). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) महानगरपालिका हद्दीतील सिडकोअंतर्गत कामोठे, तळोजे फेज-१ व २, खारघर, नवीन पनवेल तसेच पनवेल तालुक्यातील करंजाडे, उलवे मधील काही भागात तीव्र पाणी टंचाईला नागरिकांना सातत्याने सामोरे जावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त विभागात सिडकोचा पाणी पुरवठयासाठी मुख्यत्वे नवी मुंबई महापालिका, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (मजिप्रा), महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) या संस्थांकडून होणाऱ्या पाणी पुरवठ्यावर अवलंबून राहावे लागत असून त्याचा परिणाम सिडकोच्या पाणी पुरवठयावर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तालुक्यातील आंतरराष्ट्रीय विमानतळ, मेट्रो रेल्वे, नैना प्रकल्प, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मोठे गृहनिर्माण प्रकल्प यासारख्या प्रकल्पांमुळे व परिसरातील वाढत्या लोकसंख्येमुळे सद्यस्थितीत होणारा पाणी पुरवठा अत्यंत कमी पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पनवेल महानगरपालिका हद्दीतील सिडको अंतर्गत नियमित व सुरळीत पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०५-२०२४) :** (१), (२), (३) व (४) सिडको अंतर्गत पनवेल व उरण तालुक्यात होत असलेल्या अपुऱ्या व अनियमित पाणी पुरवठ्याबाबत मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे अध्यक्षतेखाली दि.३०.१.२०२४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये संबंधित अंमलबजावणी यंत्रणांना दि.२९.२.२०२४ रोजीच्या इतिवृत्ताद्वारे निर्देश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (RCH २) पनवेल महानगरपालिकेत कंत्राटी पद्धतीने कार्यरत कर्मचाऱ्यांना स्थायी स्वरूपात नियुक्ती देण्याबाबत**

**(२३) ७१७३१ (०६-०२-२०२४). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (RCH २) पनवेल महानगरपालिकेत कंत्राटी पद्धतीने कार्यरत कर्मचाऱ्यांना स्थायी स्वरूपात नियुक्ती देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे माहे जुलै, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या १५ ते १६ वर्षे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना पनवेल महानगरपालिकेत कायमस्वरूपी सामावून घेण्याबाबत कंत्राटी कर्मचाऱ्यांनी महापालिकेकडे वेळोवेळी विनंती अर्ज सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (RCH २) सन २००६ पासून निरलसपणे कंत्राटी पद्धतीने कार्यरत कर्मचाऱ्यांना मीरा भाईदर, कल्याण डोंबिवली व भिवंडी महानगरपालिकेच्या सेवेत कायम स्वरूपी सामावून घेण्यास शासनाने यापूर्वीच मंजूरी दिलेली आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मीरा भाईदर, कल्याण डोंबिवली व भिवंडी महानगरपालिकेच्या धर्तीवर पनवेल महानगरपालिकेत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (RCH २) कंत्राटी पद्धतीने कार्यरत कर्मचाऱ्यांना कायम स्वरूपात नियुक्ती देण्याबाबत कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०४-२०२४) :** (१), (२), (३) व (४) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.
सदर प्रकरणी शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे दिवंगत ज्येष्ठ नेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याबाबत**

**(२४) ७१८०७ (०६-०२-२०२४). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे दिवंगत ज्येष्ठ नेते दि.बा. पाटील यांचे नाव अद्याप देण्यात न आल्याने येथील स्थानिक नागरिकांनी पुन्हा आंदोलनाचा इशारा दिला असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि.बा.पाटील यांचे नाव देण्याचा प्रस्ताव विधानसभेने मंजूर केल्यानंतर देखील या विमानतळाचे नामकरण न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या कारणानुसार शासनाने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला ज्येष्ठ नेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०५-२०२४) :** (१), (२) व (३) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास "लोकनेते दि.बा.पाटील नवी मुंबई विमानतळ" असे नाव देण्याच्या प्रस्तावास विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळाल्यानंतर भारत सरकारच्या नागरी विमानचालन मंत्रालयाकडे दि.७.१०.२०२२ रोजी प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावावर अद्यापि अंतिम निर्णय झालेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे येथील चांदनी चौक उड्डाणपूल परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभरण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत**

**(२५) ७२००१ (१५-०२-२०२४). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील चांदनी चौक उड्डाणपूल परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याबाबतचा प्रस्ताव कार्यवाही विना प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर-२०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे ,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चांदनी चौक उड्डाणपूल परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांनी पुणे महानगरपालिका प्रशासनाला सदरच्या निवेदनाच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करण्याचे आदेश निर्गमित केले असल्याचे व सदर आदेशाच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिका प्रशासनाने अद्यापही कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले व त्यानुसार उक्त निवदेनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०४-२०२४) :** (१) नाही.
(२) होय
(३) व (४) पुणे महानगरपालिकेमार्फत चांदणी चौकामध्ये स्वराज्य निर्मिती शिल्प उभारणे अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याबाबत निविदा जाहिरात देण्यात आली असून मा. विधानसभा सदस्यांचे पुतळा उभारण्याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन व सूचना घेण्यात येत आहेत. प्रस्तुत कामासाठी पुणे महानगरपालिकेच्या आर्किटेक्ट पॅनेल वरील परवानाधारक वास्तुविशारद श्री. सतिश कांबळे यांची दि.१३.१२.२०२३ च्या पत्रान्वये नेमणूक करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवतनाही.

---

## कोल्हापूर शहरात गोरगरीब, भिकारी, निराधार व्यक्तींसाठी आधार केंद्रे उभारणेबाबत

**(२६) ७२२११ (१७-०२-२०२४). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहराला ऐतिहासिक छत्रपती शाहू महाराजांचा वारसा लाभला असून त्यांची जन्मभूमी व कर्मभूमी म्हणून जगात या शहराची ओळख आहे. तसेच जगप्रसिद्ध करवीर निवासिनी अंबाबाईचे अधिष्ठान असल्याने दररोज या कोल्हापूर शहरात लाखोंच्या संख्येने भाविक भक्त विशेषतः पर्यटक येत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी गोरगरीब भिकाऱ्यांची संख्या ही दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे शहरामध्ये म्हैसूरच्या धर्तीवर आधार केंद्र उभारण्यात यावेत अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व रहिवाशी यांच्याकडून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त ठिकाणी आधार केंद्र उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०५-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) कोल्हापूर शहरामध्ये म्हैसुरच्या धर्तीवर आधार केंद्र उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी महानगरपालिकेकडे केल्याचे दिसून येत नाही.

(३) दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (DAY-NULM) अंतर्गत शहरामध्ये बेघरांसाठी ४ ठिकाणी बेघर निवारे सुरु करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर शहरातील प्रवेशद्वारावर सुशोभीकरण व महिलांकरीता स्वतंत्र स्वच्छतागृहे उभारण्याबाबत

**(२७) ७२२१२ (१५-०२-२०२४). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहराला ऐतिहासिक छत्रपती शाहू महाराजांचा वारसा लाभलेल्या तसेच करवीर निवासीनी श्री अंबाबाईचे जागृत देवस्थान असलेल्या शहरात लाखोंच्या संख्येने भाविक / पर्यटक येत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कोल्हापूर प्रवेशद्वारावर आकर्षक व ऐतिहासिक कमानी उभारून सदरचा परिसर शुशोभीकरण करण्याची मागणी अनेकदा स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीकांनी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रात महिलांकरीता स्वच्छतागृहे नसल्यामुळे सर्वसामान्य महिला भाविकांना व नागरिकांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे, त्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी व महिला वर्गाने नवीन स्वच्छता उभारण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने माहिती घेऊन कोल्हापूर शहरातील प्रवेशद्वारावर सुशोभीकरण तसेच स्वतंत्र महिला स्वच्छतागृहे उभारण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०४-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) कोल्हापूर शहरामध्ये महिलांसाठी स्वच्छतागृहे बांधण्यासाठी सन-२०१७-२०१८ या आर्थिक वर्षामध्ये निधीची तरतूद करण्यात आली होती. त्यानुसार शहरातील गर्दीची ठिकाणे, बाजारपेठ, भाजी मंडई, बस थांबे इ. ठिकाणी महिलांसाठी प्रत्येकी २ सिट्सच्या वॉश-बेसिनसह स्वच्छतागृहे प्रस्तावित करण्यात आली होती. सदर कामापैकी यल्लमा

मंदीर ओढयावर, शाहू खासबाग मैदान के. एम.टी.बस स्टॉप समोर, ए/ वॉर्ड खराडे कॉलेज कंपौंड रंकाळा रोड, जयप्रकाश नारायण उद्यानामध्ये, रंकाळा चौपाटी व रंकाळा पदपथ या ठिकाणी महिलासांठी स्वच्छतागृह बांधण्याची कामे पुर्णत्वास आली असून सदर स्वच्छतागृहांचा वापर सुरू आहे.

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये केशवराव भोसले नाटयगृह, गांधी मैदान विभागीय कार्यालय, के.एम.सी. कॉलेज, मध्यवर्ती बसस्थानक, ताराबाई उद्यान येथे महिलांसाठी स्वच्छतागृहाची कामे पूर्णत्वास आली आहेत.

महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनायामार्फत शहरातील पर्यटन, सांस्कृतिक व धार्मिक महत्वाच्या ठिकाणी आकांक्षी स्वच्छतागृहे बांधण्यासाठी प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली असून निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील प्रादेशिक कार्यालयाकडून वाहनचालकांना**
**मिळणाऱ्या स्मार्ट कार्ड परवान्याबाबत**

**(२८) ७२५२५ (०८-०२-२०२४). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन विभागाने दिलेल्या माहितीनुसार राज्यात जवळपास अडीच लाखाहून अधिक वाहन परवाने प्रलंबित असल्याचे तसेच प्रत्येक प्रादेशिक कार्यालयात दरमहा वीस हजारांवर वाहनधारक परवान्यासाठी परीक्षा देतात त्यानुसार मुंबई, पुणे या शहरातील तीस हजारांपेक्षा अधिक लोकांनी परीक्षा दिली अशांना एका महिन्यात स्मार्ट कार्ड देणे बंधनकारक असून त्यांना स्मार्ट कार्ड मिळेपर्यंत सध्या कागदावर परवाना दिला जात असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परवान्याची मुदत संपून दोन-तीन महिने होवूनही स्मार्ट कार्ड मिळत नसल्याने वाहनचालकांना पोलिसांकडून होणाऱ्या दंडाचा भुर्दंड सोसावा लागत असल्याची बाब दिनांक १४ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील वाहनधारकांना वाहन चालवण्याचा परवाना आणि वाहन नोंदणी प्रमाणपत्रांचे स्मार्ट कार्ड देण्याचे काम महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाने कर्नाटकातील ‘द एमसीटी कार्ड अँण्ड टेक्नोलॉजी प्रा. लि. या कंपनीस माहे जून २०२३ मध्ये दिले असून सदरहू कंपनीने स्मार्ट कार्डच्या छपाईचे काम सुरू करण्यास विलंब केल्याने राज्यात वाहन परवान्याचा तुटवडा निर्माण झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागरिकांना लर्निंग लायसन्ससाठी ऑनलाईन परीक्षा देतांना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत असुन नागरिक ऑनलाईन परिक्षा देतांना एखादा दुसरा आवाज झाला, परीक्षार्थीच्या पाठीमागून कोणी व्यक्ती गेली व ते कॅमेऱ्यांने टिपले तरी त्या परिक्षार्थीना अनुत्तीर्ण करण्यात येत असल्यामुळे त्यांना पुन्हा लर्निंग लायसन्ससाठी आरटीओ मध्ये जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुसार राज्यातील वाहनचालकांना स्मार्ट कार्ड परवाना देण्यास विलंब करणाऱ्या संबंधित कंपनीवर व दोषींवर कारवाई करण्यासह वाहन चालकांना विहित मुदतीत स्मार्ट कार्ड परवाना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०५-२०२४) :** (१) नाही.
(२) नाही.

प्रादेशिक /उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातून अनुज्ञप्तीचे अर्जास अंतिम मान्यता दिल्यानंतर अर्जदार स्वत:ची अनुज्ञप्ती केंद्र शासनाच्या डिजी लॉकर या ॲपमध्ये डाऊनलोड करु शकतो व सदर अनुज्ञप्ती ग्राह्य धरण्यात येते.
(३) अंशत: खरे आहे.

अनुज्ञप्ती व वाहन नोंदणी प्रमाणपत्र छपाई करण्याकरीता मे. एम.सी.टी. यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचेमार्फत ऑगस्ट, २०२३ पासून छपाई सुरु करण्यात आली आहे. पोस्ट विभाग व राष्ट्रीय सुचना केंद्र यांच्याशी सांधेजोडणीच्या तांत्रिक अडचणीमुळे थोडे उशिर झाले असून ऑगस्ट, २०२३ पर्यंत जूने सेवापुरवठादारामार्फत छपाईचे काम सुरु ठेवण्यात आले आहे.
(४) होय.

विभागाने आधार क्रमांकाचा वापर करुन घरबसल्या शिकाऊ अनुज्ञप्ती कार्यपध्दती जून २०२१ पासून सुरु केले आहे. सदर पध्दती अधिक सक्षम करण्याकरीता प्रॉक्टरींग (Facial recognition) चा वापर सुध्दा सुरू करण्यात आला आहे. शिकाऊ अनुज्ञप्तीची चाचणी देताना परीक्षार्थी सोडून इतर व्यक्ती कॅमेऱ्यामध्ये दिसल्यास अथवा परिक्षार्थी कॅमेऱ्यामध्ये अनुपस्थित असल्यास अशा अर्जदारास कार्यालयामध्ये यावे लागते.
(५) घर बसल्या अनुज्ञप्तीची कार्यपध्दती राष्ट्रीय सूचना केंद्र या संस्थेमार्फत विकसीत करण्यात आली असून पूर्ण देशभर सुरु आहे. त्यांच्या मार्फत सदर कार्यपध्दती मध्ये नियमीत सुधारणा करण्यात येते. सद्यस्थितीत प्रलंबित अनुज्ञप्तीची छपाई पूर्ण करुन नागरीकांना पोस्टाव्दारे पाठविण्यात आली आहे.
(६) प्रश्न उदभवत नाही.

---

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याची उंची वाढविणे व सुशोभीकरण करण्याकरीता वास्तुविशारद यांची नियुक्ती करण्याबाबत

**(२९) ७२६१५ (११-०२-२०२४). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याची उंची वाढविणे व सुशोभिकरण करणे तसेच पुतळयाच्या चबुतराचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात यावे तसेच त्यासाठी वास्तुविशारद (Architect) तात्काळ नेमण्यात यावा, अशी जिल्ह्यातील व शहरातील नागरिकांकडून वारंवार मागणी करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याबाबत प्रशासक, नगरपरिषद, बीड, मुख्याधिकारी, नगरपरिषद बीड यांचे स्तरावर मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे उपस्थितीत माहे फेब्रुवारी, २०२२ पासून आजतागायत अनेकदा बैठकी घेण्यात आलेल्या असून त्यानंतर परिषदेकडून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे माहे मार्च, २०२३ रोजी त्यासंदर्भातील प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी तत्कालीन बीड जिल्हा पालकमंत्री व सामाजिक न्याय मंत्री यांनी देखील, सदर प्रस्तावावर सकारात्मक कार्यवाही करण्याबाबत माहे मे, २०२२ मध्ये जिल्हाधिकारी, बीड यांना आदेशित करण्यात आलेले असणे, याशिवाय, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी देखील जिल्हाधिकारी, बीड तसेच प्रशासक, मुख्याधिकारी नगरपरिषद, बीड यांचेकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आला आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याबाबत तातडीने चौकशी करुन सदर प्रस्तावानुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याची उंची वाढवून सुशोभिकरण करण्याची तसेच चबुतऱ्याचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन त्यासाठी वास्तुविशारद (Architecture) नियुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०४-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणी बीड नगरपरिषदेमार्फत ई-निविदा प्रक्रिया राबवून, एम.के.के.कन्सल्टंट प्रा.लि, बीड यांची "प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार" म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयाच्या चबुतऱ्याचे संरचनात्मक लेखापरिक्षण करुन अहवाल सादर करण्याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड यांना बीड नगरपरिषदेमार्फत दि.२५.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड व नगरपरिषद स्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाळीसगाव (जि.जळगांव) नगरपरिषद येथील रिक्त पदांबाबत

**(३०) ७३००९ (११-०२-२०२४). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव (जि.जळगाव) नगरपरिषदेत राज्यस्तरीय संवर्ग कर्मचाऱ्यांची एकुण मंजूर पदे ३० असून, त्यापैकी कार्यरत पदे १० असुन २० पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चाळीसगाव नगरपरिषद ही ब-वर्ग नगरपरिषद असल्याने संख्याबळ अभावी दैनंदिन कामे पार पडण्यास अनेक अडचणी निर्माण होत असुन, सदरची कामे विहित मुदतीत पूर्ण करणे कामी कार्यरत कर्मचारी यांना अतिरिक्त भार सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, चाळीसगाव नगरपरिषदेच्या आकृतीबंध हा २००१ च्या जनगणनेनुसार मंजूर करण्यात आलेला आहे, तसेच सुधारित आकृतीबंधानुसार व शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता अधिक कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याने सुधारित होणाऱ्या आकृतीबंधात नवीन पदे निर्माण करणे अत्यावश्यक आहे, हे हि खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी सुशासनाच्या दृष्टीने राज्यस्तरीय संवर्गाचे रिक्त असलेली २० पदे व होणाऱ्या नवीन आकृतीबंधात जादा पदे निर्माण करण्याबाबत केलेल्या मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०४-२०२४) :** (१) अंशतः खरे आहे.
चाळीसगाव नगरपरिषदेमध्ये राज्यस्तरीय संवर्ग कर्मचाऱ्यांची एकूण ३४ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ०९ पदे कार्यरत असून २५ पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या दि.२०.०१.२००६ रोजीच्या आदेशान्वये चाळीसगाव नगरपरिषद कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. तसेच दि.१२.०२.२०१८ व दि.११.०९.२०१९ रोजीच्या शासन निर्णयांन्वये चाळीसगाव नगरपरिषदेकरीता ३४ पदांचा सुधारीत आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे.
अशा आशयाचे मागणी वजा निवेदन नगरपरिषद प्रशासन संचालनालयास प्राप्त झालेले नाही.
तथापि, राज्यातील महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीय संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालयाद्वारे दि.११.०७.२०२३ रोजी सरळसेवा पदभरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध करुन, माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये परिक्षा घेण्यात आली असून, त्यानुषंगाने नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत कार्यवाही सुरु आहे.
तसेच जळगाव जिल्ह्यातील नगरपरिषद आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत शासकीय पॅनल वरील IBPS कंपनीला कळविण्यात आले असून, त्यानुषंगाने जिल्हास्तरावरही कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली महापालिकेत अद्ययावत वैद्यकीय सेवासुविधा पुरविण्याबाबत

**(३१) ७३२७६ (१६-०२-२०२४). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली येथे महानगरपालिका स्थापन होऊन २५ वर्षे होऊनही येथे आरोग्य सेवा, वैद्यकीय सेवा-सुविधांबाबत महापालिकेची यंत्रणा अजूनही प्राथमिक स्वरुपात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी वारणाली मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलची इमारत पुर्णत्वास आल्यानंतर, सदर इमारतीमध्ये ५ कोटी रुपयांअभावी वैद्यकीय उपकरणे, फर्निचर, इलेक्ट्रिफिकेशनचे काम सहा महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने माहिती घेऊन सदरील महानगरपालिकेत अद्ययावत वैद्यकीय सेवा सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना २०२३-२४ अंतर्गत विकास योजना आराखडयातील कामांसाठी वितरीत केलेल्या निधीमधून वारणाली मल्टी स्पेशालिटी रुग्णालयाच्या वाढीव कामाकरीता रु.३ कोटी इतका निधी महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे. सदर निधीमधून रुग्णालयाची इमारत पुर्णत्वास नेण्यासाठी आवश्यक कामे महानगरपालिकेकडून करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मानवत नगर परिषद (जि.परभणी) येथील कंत्राटी कामगारांना थकित वेतन देणेबाबत

**(३२) ७३४५८ (१६-०२-२०२४). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानवत नगरपरिषद (जि.परभणी) मधील कंत्राटी कामगारांना सणांना असलेल्या सुट्टीच्या दिवशी काम करुन वेतन देण्यात आले नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वात्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटी कामगारांना थकित वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) मानवत नगरपरिषद येथील घनकचरा संकलन व्यवस्थापन (संकलन, वाहतूक व इतर अनुषंगीक कामे) हे काम कंत्राटी पद्धतीने ऑक्टोबर, २०२० ते ऑक्टोबर, २०२३ या ३ वर्षाच्या कालावधीकरीता मे.टेरामेयर इंडिया प्रा.लि., मुंबई यांना देण्यात आले होते. कंत्राटदार यांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार वेळोवेळी कंत्राटी कामगार यांना वेतन अदा केलेले आहे. त्यामुळे कंत्राटी कामगारांचे कोणतेही मानधन आजपावेतो थकीत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर महानगरपालिकेतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३३) ७३५५९ (११-०२-२०२४). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महानगरपालिकेतील आकृतीबंधाची तपासणी करुन एक वेळची बाब म्हणून आस्थापना खर्चाच्या ३५% मर्यादेची अट शिथील करुन अत्यावश्यक व अत्यंत गरजेची पदे भरण्याबाबत निर्देश देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर महानगरपालिकेत पूर्वीच्या मंजूर आस्थापनांवरील अधिकारी-कर्मचारी यांच्या ४६६१ पदांपैकी सुमारे १७८२ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गेल्या अनेक वर्षापासून एवढी पदे रिक्त असल्याने प्रशासनावर कामकाज चालविणे आव्हान झाले असून उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने माहिती घेऊन रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०४-२०२४) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) कोल्हापूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अत्यावश्यक सेवेतील पदे भरण्यासाठी शासनाने दि.१४/०२/२०२३ रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार पदभरतीबाबतची कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्ह्यातील कुळगाव-बदलापूर नगरपालिकेच्या दुबे रुग्णालयात नागरिकांना उद्भवणाऱ्या समस्यांबाबत

**(३४) ७३८५३ (१७-०२-२०२४). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कुळगाव-बदलापूर नगरपालिकेच्या दुबे रुग्णालयातील एकमेव वैद्यकीय अधिकारी असलेले डॉ.राजेश अंकुश हे कामानिमित्त सुट्टीवर असल्यामुळे दिनांक ६ ऑक्टोबर, २०२३ रोजी संपूर्ण दिवस पालिकेचे रुग्णालय बंद ठेवण्यात आल्यामुळे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना प्रवेशद्वारातूनच तपासणीसाठी रुग्णालय बंद असल्याचे सांगून ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास काही दिवसांपूर्वी याच रुग्णालयातील ४०० ते ५०० रुग्णांसाठी एकच डॉक्टर कार्यरत असल्याची बाब निदर्शनास आल्यानंतरही प्रशासनाला जाग आलेली नसून चक्क डॉक्टर बैठकीत व्यस्त असल्याचे कारण सांगून रुग्णालयच बंद ठेवण्याची वेळ पालिकेवर आली असल्याने रुग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास या संदर्भात पर्यायी डॉक्टरांची व्यवस्था करण्यासाठी अनेकदा मुख्याधिकारी तसेच संबंधित अधिकाऱ्यांना विनंती करूनही कोणत्याही प्रकारची कार्यवाही वा उपायोजना केली नसल्याने मागील दोन ते तीन वर्षापासून सुरू असून कुळगाव बदलापूर येथील नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कुळगाव बदलापूर पालिकेच्या दुबे रुग्णालयात नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी मोठ्या संख्येने वैद्यकीय अधिकारी डॉक्टर्स परिचारिका तसेच रुग्णालयासाठी लागणारे गरजेचे साहित्य उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०४-२०२४) :** (१) व (२) कुळगांव बदलापुर नगरपरिषदेच्या कै.बि.एस दुबे रुग्णालयात कार्यरत असलेले एकमेव वैद्यकिय अधिकारी दि.०६ ऑक्टोबर, २०२३ रोजी किरकोळ रजेवर असल्याने त्याबाबतची सूचना रुग्णालयाच्या सूचना फलकावर लावण्यात आली होती. तसेच रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणुन त्यांना ग्रामिण रुग्णालय, बदलापुर येथे उपचारासाठी पाठविण्यात आले.

वैद्यकिय अधिकारी यांना वरिष्ठ कार्यालयात कार्यालयीन कामाकरीता हजर रहावे लागल्यास, प्रकृती बिघडल्यास किंवा रजेवर राहिल्यास रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणुन त्यांना ग्रामिण रुग्णालय, बदलापुर येथे उपचारासाठी पाठविण्यात येते. तसेच गंभीर रुग्ण आल्यास नगरपरिषदेच्या रुग्णवाहिकेतून ग्रामिण रुग्णालय, बदलापुर येथे दाखल करण्यात येते. ज्या दिवशी वैद्यकिय अधिकारी उपस्थित नसतात, त्या दिवशी बाहयरुग्ण तपासणी (OPD) होत नाही. तथापि, लहान बालके तसेच गरोदर माता यांची नोंदणी व लसीकरण नियमितपणे सुरु असते.

(३) व (४) पर्यायी डॉक्टराची व्यवस्था करण्याकरीता जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे तसेच जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, ठाणे यांना कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेने कळविले असून त्यासाठी नगरपरिषदेकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवतनाही.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) शहरात अस्तित्वात नसलेल्या हरितपाट्यांच्या कामांची चौकशी करण्याबाबत

**(३५) ७४०७८ (०६-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) शहरात मोठ्या प्रमाणात खर्च करुन हरितपाट्यांची कामे करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात अंबाजोगाई शहरात कोठेही हरितपट्टा अस्तित्वात नसल्यामुळे उक्त शहरात करण्यात आलेल्या हरितपाट्यांच्या पूर्ण कामांची चौकशी करून कार्यवाही करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक १८ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे,

अशा आशयाचे मा.उपमुख्यमंत्री यांना उद्देशून लिहिलेले स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दि.१८ ऑक्टोबर, २०२३ रोजीचे पत्र जिल्हाधिकारी, बीड यांच्या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्याकरीता जिल्हाधिकारी, बीड यांच्या दि.१३ मार्च, २०२४ रोजीच्या आदेशान्वये उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. यानुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

---

## मालवण (जि.सिंधुदुर्ग) शहरातील भाजी मंडईच्या इमारतीचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३६) ७४१४१ (११-०२-२०२४). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) शहरातील भाजी मंडईच्या इमारतीचे काम सीआरझेडच्या समस्येमुळे गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सीआरझेडच्या परवानगीबाबत संबंधित समितीकडे आवश्यक पाठपुरावा करण्याकडे नगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी तात्काळ पाठपुरावा करण्यात यावा अशी मागणी व सुचना मुख्याधिकारी यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त भाजी मंडईच्या इमारतीचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी सीआरझेडची परवानगी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) मालवण भाजी मार्केट इमारतीचे पुनर्बांधकाम करण्यास सिआरझेड परवानगी नाहरकत मिळणेबाबतचा प्रस्ताव अध्यक्ष, महाराष्ट्र कोस्टल झोन ऑथोरेटी, मुंबई यांच्याकडे सादर करण्यात आला असून आवश्यक पाठपुरावा नगरपरिषदेकडून करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक शहरातील सिडकोच्या मिळकती फ्रीहोल्ड होणार असल्याबाबत**

**(३७) ७४२३० (१५-०२-२०२४). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील सिडकोच्या मिळकती फ्रीहोल्ड होणार असल्याचे मागील शासनाच्या माध्यमातून घोषित करण्यात आले परंतु अद्यापपर्यंत या बाबतीतील शासन निर्णय निर्गमित करण्यात आले नसल्याने सिडकोच्या सहा योजना एक-एक करुन महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आल्या असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, बांधकाम परवानगीचे अधिकार ही नाशिक महानगरपालिकेला देण्यात आले, परिणामी नाशिककरांना नविन बांधकामासाठी महानगरपालिकेकडून परवानगी घ्यावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सिडकोच्या मिळतीत फ्रीहोल्ड होणार असल्याने हस्तांतरण फी भरण्याची गरज नसल्याने व त्यामुळे हजारो रुपयांची बचत होणार असल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण झाले असताना या निर्णयाची अंमलबजावणी न झाल्याने नागरिकांमध्ये प्रचंड संभ्रम निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने तातडीने लक्ष घालून नाशिककरांना दिलासा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०५-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) "विशेष नियोजन प्राधिकरणा"चे अधिकार दि.१४.१०.२०१६ रोजी नाशिक महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आल्याने सिडको महामंडळाच्या ना-हरकतच्या अनुषंगाने नाशिक महानगर पालिकेकडून बांधकाम परवानगी देण्यात येते.
(३) नवी मुंबई क्षेत्रातील सिडकोच्या मालकीच्या भाडेपट्ट्याच्या जमिनी लिज होल्ड ते फ्री होल्डसम करण्यासंदर्भातील शासनाच्या दि.२०.१२.२०१८ च्या पत्राच्या अनुषंगाने सिडको संचालक मंडळाने पारित केलेल्या ठराव क्र. ११९१२ मध्ये अंशत: बदल करुन मान्यता देण्यात आली आहे. सदरचे निर्देश नाशिक व छत्रपती संभाजीनगर शहरासाठी लागू आहेत.

तसेच, यासंदर्भातील सिडको संचालक मंडळाचा ठराव क्र.१२२९८ शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अंबाजोगाई (जि. बीड) येथील पर्यटनस्थळांच्या कामांना पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(३८) ७४७५७ (२०-०२-२०२४). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि. बीड) येथील पर्यटनस्थळांना पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत सन २०२२-२३ मध्ये विविध विकास कामांसाठी रुपये १००० लक्ष एवढ्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पर्यटन संचालनालयास/महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या कामासाठी रुपये ५०० लक्ष एवढा निधी सन २०२२-२०२३ मध्ये वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन आदेशान्वये वितरीत रुपये ५०० लक्ष एवढा निधी त्वरित उपलब्ध करून देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.पर्यटन मंत्री, यांच्याकडे दिनांक ११ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०९-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे,
(३) होय, हे खरे आहे. पर्यटन विभाग शासन निर्णय दि.१८ मार्च,२०२४ अन्वये रु. ५०० लक्ष निधी पर्यटन संचालनालयास वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेचे तत्कालीन लेखाधिकारी व तत्कालीन मुख्याधिकारी यांनी सुरक्षा ठेव रक्कमेचा केलेला गैरव्यवहार

**(३९) ७५०७० (१७-०२-२०२४). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुळगाव-बदलापूर (जि.ठाणे) नगर परिषदेचे तत्कालीन लेखाधिकारी, श्री.प्रवीण वडगाये व तत्कालीन मुख्याधिकारी यांनी ठेकेदारांनी भरलेली सुरक्षा ठेव रक्कम सार्वजनिक हिताच्या नसलेल्या विकास कामांसाठी कमानी उभारणी, सेल्फी पॉइंट उभारणी इत्यादी कामांसाठी खर्च केल्याची गंभीर बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करुन सुरक्षा अनामत रकमेची मागणी करणाऱ्या ठेकेदारास सुरक्षा ठेव परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) कुळगाव बदलापूर नगरपरिषदेतील विकासकामे पुर्ण केल्यानंतर काम पुर्णत्वाचा दाखला संबंधित ठेकेदारास देण्यात येतो. त्यानंतर ठेकेदारांनी सुरक्षा अनामत रकमेची मागणी केल्यास देयकातून कपात केलेली रक्कम, तसेच ठेकेदाराने सुरक्षा अनामत रकमेची केलेल्या मागणीची सत्यता पडताळण्यात येते. कामाची सद्यस्थिती तसेच, कामाचा दोषदायित्व कालावधी विचारात घेऊन, लेखापरिक्षणविषयक बाबींची पुर्तता केल्यानंतर सुरक्षा अनामत रक्कम परत करण्याची कार्यवाही नगरपरिषदेकडून करण्यात येते. त्यानुसार मागणीपत्र प्राप्त झालेल्या व सुरक्षा ठेव परत करणे योग्य असलेल्या ठेकेदारांना सुरक्षा अनामत रक्कम परत करण्याची कार्यवाही नगरपरिषदेकडून सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जालना महानगरपालिकेमध्ये लाच घेताना कनिष्ठ लिपीकाला अटक केल्याबाबत

**(४०) ७५१९१ (१६-०२-२०२४). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना महानगरपालिकेमध्ये मोठया प्रमाणात लाचखोरी वाढली असून रिव्हीजन रजिस्टरची नक्कल काढण्यासाठी ८०० रुपयांची लाच स्वीकारताना कनिष्ठ लिपीक यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतले असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन त्याला तात्काळ निलंबीत करुन त्याच्यावर फौजदारी कारवाई करण्यासह येथे वाढत असलेले लाचखोरी मोडीत काढण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०४-२०२४) :** (१) अंशतः खरे आहे.
सदर प्रकरणी श्री.नदीम चौधरी, फायरमन, अतिरिक्त पदभार लिपीक, अभिलेख कक्ष, जालना शहर महानगरपालिका यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दि.०४.०९.२०२३ रोजी ताब्यात घेतले होते.
(२) सदर प्रकरणी श्री.नदीम चौधरी, फायरमन, अतिरिक्त पदभार लिपीक, अभिलेख कक्ष, जालना शहर महानगरपालिका त्यांच्याविरुद्ध पोलिस स्टेशन कदीम जालना येथे गु.र. नं.३९०/२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानुसार आयुक्त तथा प्रशासक, जालना शहर महानगरपालिका यांनी दि.०५.०९.२०२३ रोजीच्या आदेशान्वये श्री.नदीम चौधरी, फायरमन यांना निलंबित केले आहे.
तसेच लाचखोरी होऊ नये याकरीता कार्यालयात जनजागृती करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या IWBP या संकेतस्थळावर सिटीजन चार्टर (नागरिकांची सनद) व विविध प्रकारच्या सेवा नागरिकांना ऑनलाईन पद्धतीने देण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाडा (जि.पालघर) येथील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्त्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(४१) ७५४७४ (०७-०३-२०२४). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** न्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील खैरे-कोंढले, कुडूस-देवघर, सापने बु., टोकरेपाडा, कोन-बिलघर, गोऱ्हे-गालथरे व खैरे ते कोंढले मार्गे दिनकरपाडा अशा अनके रस्त्याचे डांबरीकरण मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत करण्यात येवून अल्पावधीत सदरहू रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांकरिता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून खैरे 'आंबिवली' ते कोंढले मार्गे वडवली या रस्त्याचे डांबरीकरणाकरिता तब्बल रुपये ४.८३ कोटी खर्च करण्यात आले असून सदरहू रस्त्यांची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोने-बिलघर येथील १० किमी लांबीच्या मार्गाच्या कामासाठी सन २०२०-२१ या वर्षी कंत्राटदाराला खड्डे भरणे, रस्त्याकडेचे गवत कापणे, पावसाळयात रस्त्याचे रक्षण करणे, अशा विविध कामांसाठी कंत्राटदाराला तब्बल रुपये ७ कोटी ६० लख इतक्या निधीस मंजुरी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कंत्राटदाराने मागील वर्षात कोन मार्गावरील ५ किमी अंतरावर एकही खड्डा भरलेला नसून तसेच रस्त्याची सर्व कामे निकृष्ट दर्जाची केली असूनही कंत्राटदारास वेळेवर पैसे अदा करण्यात आलेले असूनही सदरहू रस्त्याच्या गैरव्यवहार व भ्रष्टाचाराबाबत स्थानिक ग्रामस्थांनी वेळोवेळी संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारीही केल्या, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर सर्वच रस्त्याच्या कामाच्या देखभाल दुरूस्ती संदर्भात उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन कंत्राटदार व संबंधीत अधिकाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी मा.पालकमंत्री, पालघर जिल्हा, मा.ग्रामविकास मंत्री, जिल्हाधिकारी पालघर, कार्यकारी अभियंता मुख्यमंत्री ग्राम सडक योजना पालघर आदिंकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-०५-२०२४) :** (१) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतर्गत प्रस्तावित करण्यात आलेल्या रस्त्यांची दर्जोन्नती ही योजनेच्या प्रचलित निकष व मानकानुसार करण्यात येते. यास्तव सदरहू रस्त्यावर सुमारे ८ ते १० मेट्रीक टन इतक्या भाराची वाहतूक वर्दळ विचारात घेऊन कामाचा वाव निश्चित करण्यात येतो. प्रश्नाधीन रस्त्यावर परिसरातील Steel Rolling Mil, Express Highway, Bullet Train, JNPT इत्यादी प्रकल्पांमुळे सरासरी ३० ते ४० मे.टन क्षमतेची अवजड वाहनांमुळे रस्त्याचा पृष्ठभाग काही ठिकाणी खराब होत आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.
(५) हे अंशत: खरे आहे.
(६) राज्य गुणवत्ता निरिक्षक अधिकारी यांचे मार्फत कामाची पाहणी करण्यात आलेली आहे.
(७) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## प्रभादेवी (मुंबई) येथील कामगारनगर येथील प्रकल्पग्रस्तांना घरे देण्यास होत असलेल्या विलंबाबाबत

**(४२) ७५५१३ (१७-०२-२०२४). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील शिवडी-वरळी जोडमार्गातील प्रकल्पबाधीतांपैकी प्रभादेवीच्या कामगारनगर येथील ५० ते ६० कुटुंबियांना प्रभादेवी परिसरात पर्यायी प्रकल्पग्रस्त घरे देण्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून टाळाटाळ करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्प बाधितांना अद्याप पर्यायी घरे किंवा घरभाडेही देण्यात आलेले नसल्यामुळे सदर कुटुंबिय गेल्या २ वर्षापासून स्वत:चे पैसे भरुन भाड्याच्या घरात राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी प्रकल्पग्रस्तांसोबत मा.मुख्यमंत्री यांनी माहे मे, २०२३ मध्ये सह्याद्री अतिथीगृहात घेतलेल्या बैठकीत प्रकल्पाचे बांधकाम, भूसंपादन, प्रकल्पग्रस्त घरे, घरभाडे व कायमस्वरुपी पुनर्वसनाची कामे तातडीने पूर्ण

करण्याचे निर्देश मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई महापालिका आणि म्हाडाच्या अधिकाऱ्यांना देऊनही त्याची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०५-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

शिवडी-वरळी जोडमार्गातील प्रकल्पबाधीतांपैकी कामगार नगर-१ येथील १८५ प्रकल्पग्रस्तांचे तात्पुरते पुनर्वसन शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्या. यांच्यामार्फ़त तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध जास्मीन मिल, धारावी येथील सदनिकांमध्ये ११७ प्रकल्पग्रस्तांचे आणि सेंच्युरी मिल, वरळी येथील सदनिकांमध्ये ५९ प्रकल्पाग्रस्तांचे तात्पुरते पुनर्वसन करण्यात आलेले आहे व ९ प्रकल्पग्रस्तांना रु.२००००/- प्रति माह याप्रमाणे घरभाडे देण्यात येत आहे. अशा प्रकारे सर्व १८५ प्रकल्पग्रस्तांचे तात्पुरते पुनर्वसन करण्यात आले आहे.
(३) व (४), शिवडी-वरळी उन्नत मार्गिका प्रकल्पातील रेखांकन मार्गातील कामगार नगर -२ मधील प्रत्यक्ष बाधित होणाऱ्या १६ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन जास्मिन मिल, धारावी वसाहतीमधील शिल्लक असलेल्या २७ सदनिकांमध्ये करण्याचे प्रस्तावित होते. परंतू सदर प्रकल्पग्रस्तांनी धारावी वसाहत येथे पुनर्वसन करण्यास नकार दर्शविला आहे. तसेच त्यांना विकासकाद्वारे रु.१०,०००/- दरमहा घरभाडे स्वरुपात धनादेश दिनांक ३०/०५/२०२३ रोजी जमा केले आहेत. परंतू सदर झोपडीधारकांनी धनादेश स्विकारलेले नाही. त्यामुळे सदर प्रकल्पग्रस्तांचे अद्यापपर्यंत निष्कासन करण्यात आलेले नाही ते प्रकल्पग्रस्त सद्यस्थितीमध्ये त्यांच्या मूळ घरात वास्तव्य करीत आहेत. तसेच प्राधिकरणामार्फत प्रकल्पाच्या रेखांकन मार्गातील अप्रत्यक्ष बाधित होणाऱ्या ४६ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याचे प्रस्तावित आहे. याप्रमाणे अशा एकूण प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष बाधित होणाऱ्या ६२ प्रकल्पग्रस्तांना घरभाड्यामध्ये वाढ देणे अथवा इतर ठिकाणी उपलब्ध असलेल्या सदनिकांमध्ये तात्पुरते पुनर्वसन करणे, यासंबंधीची शक्यता प्राधिकरण स्तरावर प्रकल्पग्रस्तांशी चर्चा करून निर्णय घेण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या अप्पर वर्धा धरणाच्या सिंभोरा ते अमरावती या अमृत २.० अभियानांतर्गत प्रस्तावाला मान्यता देण्याबाबत

**(४३) ७५८१४ (१६-०२-२०२४). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या अप्पर वर्धा धरणाच्या शिंबोरा ते अमरावती या अमृत २.० अभियानांतर्गत रु.९८५.४९ कोटीचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समितीने मान्यतेसाठी केंद्र शासनाकडे पाठवला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाला केंद्र शासनाने मान्यता देण्याबाबत शासनाने पाठपुरावा केला आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०४-२०२४) :** (१), (२) व (३) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत अमरावती शहराच्या रुपये ९८५.४९ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक २० फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

---

**रायगड जिल्ह्यातील गावांना जोडणाऱ्या रस्त्यांची कामे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून पूर्ण करून देण्याबाबत**

**(४४) ७५९०२ (०६-०३-२०२४). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील तळा, रहाटाड, सोनसडे, वरळ, गणेशनगर या गावांना जोडणाऱ्या रस्त्यांची कामे ठेकेदाराने अतिशय निष्कृष्ठ दर्जाची केली असल्याने रस्त्यांवर खड्डे पडल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत असून सदरच्या रस्त्यांची दुरुस्ती करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी तसेच लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांच्या कामांच्या देखभालीवर प्रशासनाचे अधिकारी नियंत्रण ठेवत नसल्याने ठेकेदारांकडून रस्त्यांची कामे निकृष्ठ दर्जाची होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू तालुक्यातील रस्त्याची कामे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून पूर्ण करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन (०७-०५-२०२४) :** (१), (२), व (३) हे खरे नाही. प्रश्नाधीन कामे ही दोषदायित्व कालावधीत असल्याने त्यांची दुरूस्ती प्रतिवर्षी करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली शहरातील नागरिकांना सुरळीत व नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत**

**(४५) ७६१२३ (०८-०२-२०२४). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली शहरातील आदर्श महाविद्यालय परिसरात सन १९८३ मध्ये नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी १८ लाख लिटर क्षमता असलेले दोन जलकुंभ उभारण्यात आले असून दोन्ही जलकुंभावरून रोटेशन पद्धतीनुसार जलकुंभ भरल्यानंतर सुमारे ३० हजार लोकसंख्येला टप्प्याटप्प्याने पाणीपुरवठा केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू दोन्हीही जलकुंभ उभारल्यानंतर आजमितीस ४० वर्षाहून अधिक कालावधी लोटल्याने सदरहू जलकुंभांची सद्या दुरवस्था झाली असून त्यामुळे पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. तसेच जलकुंभावर लोखंडी मोजमापक नसल्याने मोजमापकासाठी प्लॉस्टिकच्या डब्याचा वापर केला जातो यामुळे अपुरे व अनियमित पाणीपुरवठा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू दोन्हीही जलकुंभांची दुरवस्था व हिंगोली शहराची वाढती लोकसंख्या यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी अनेक गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागत असून पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याने नगरपालिकेने नागरिकांना प्रतीमाणसी दररोज ५५ लिटर या मानकांप्रमाणे पाणीपुरवठा करण्यात यावा. तसेच दुरवस्था झालेल्या जलकुंभांची विनाविलंब दुरुस्ती करून सुरळीत पाणीपुरवठा व्हावा, म्हणून हिंगोली नगरपरिषद, मा.पालकमंत्री, हिंगोली जिल्हा आदींकडे सातत्याने रीतसर मागणी केली आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने हिंगोली नगरपरिषद प्रशासनाने कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने हिंगोली शहरातील नागरिकांना सुरळीत, नियमित व पुरेशा प्रमाणात विनाविलंब कायमस्वरूपी पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने कोणती ठोस कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.

हिंगोली शहरातील आदर्श महाविद्यालय परिसरात सन १९८३ ते सन १९८५ दरम्यान प्रत्येकी ९ लक्ष लिटर क्षमतेचे २ जलकुंभ बांधण्यात आले आहेत.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

आदर्श महाविद्यालय परिसरातील २ जलकुंभाचे स्ट्रक्चरल ऑडीट प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड या संस्थेमार्फत करुन घेण्याबाबतची कार्यवाही नगरपरिषद स्तरावर सुरु आहे.

जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्या अहवालानुसार हिंगोली नगरपरिषदेकडे अशा प्रकारची मागणी करण्यात आलेली नाही.

तथापि, हिंगोली शहरास सिद्धेश्वर धरणातून पाणी पुरवठा करण्यात येतो. पाणीपुरवठा वितरणाच्या दृष्टीने व उपलब्ध होत असलेल्या पाणी पुरवठ्याप्रमाणे एकूण ९ जलकुंभातून झोननिहाय तीन टप्प्यात प्रती माणसी, प्रती दिवस १३५ लिटरप्रमाणे शुद्ध पाणी पुरवठा करण्यात येतो.

(५) हिंगोली नगरपरिषदेच्या वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात नागरिकांना पाणी पुरवठा करण्याकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करण्यात आली असून, त्यानुसार हिंगोली शहर सुधारीत पाणी पुरवठा योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही नगरपरिषद स्तरावर सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिवंडी (जि.ठाणे) येथील शाळा क्र. ९९ चे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याने इमारतीची झालेली दूरवस्था

**(४६) ७६२२९ (१७-०२-२०२४). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील शाळा क्र. ९९ भाग शाळा जुनी १०४ न्यू आझाद नगर ही सन २०११-१२ मध्ये बांधण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळा माहे जुलै, २०२३ मध्ये धोकादायक स्थितीमध्ये असल्यामुळे रिकामी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शाळेची इमारत १२ वर्षामध्ये धोकादायक झाल्यामुळे या बांधकामाची सखोल चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, भिवंडी महानगरपालिका यांना दिनांक १८ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे हीखरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०४-२०२४) :** (१), (२), (३) व (४) भिवंडी येथील शाळा क्र. ९९ भाग शाळा जुनी १०४, ही इमारत बांधण्याचे काम सन २०१२ मध्ये पुर्ण करण्यात आले, ही वस्तुस्थिती आहे.

सदर शाळा इमारत संरचनात्मक लेखापरिक्षण अहवालानुसार अतिधोकादायक ठरल्याने शाळा इमारत रिकामी करुन निष्कासीत करण्याची कार्यवाही बाबत आदेशित करण्यात आले आहे.

दरम्यान सदर इमारती संदर्भात लोकप्रतिनिधीकडून महानगरपालिका स्तरावर प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने सखोल चौकशी प्रस्तावित असल्याची बाब भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) महापालिकेतील सेवानिवृत्त शिक्षकांना वेतनाचे लाभ अदा करण्याबाबत**

**(४७) ७६४९८ (१७-०२-२०२४). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) महापालिकेतील सेवानिवृत्त शिक्षकांना निवृत्ती वेतन वेळेवर दिले जात नसतानाच आता वाढीव महागाई भत्ता व ७ व्या वेतन आयोगाच्या फरकासाठी भिवंडीतील सेवानिवृत्त शिक्षकांची वारंवार मागणी सुरु असून याबाबत निवेदने देऊनही त्याकडे महानगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याने संतप्त झालेल्या सेवानिवृत्त शिक्षकांनी महापालिकेवर दि. १९ ऑक्टोबर २०२३ रोजी वा त्यासुमारास धडक मोर्चा काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२२ पासून महागाई भत्त्याची ३३ लाख १८ हजार ११५ रुपये तर ७ व्या वेतन आयोगानुसार ३ ऱ्या व ४ थ्या हप्त्याची २५ लाख २६ हजार १३७ असे एकूण ५८ लाख ८४ हजार २५२ रुपये महापालिकेने अदा केले नसल्याने भिवंडी महापालिका सेवानिवृत्त शिक्षक कृती समितीचे अध्यक्ष श्री.सुधाकर भालेराव, श्री.सचिव नरेंद्र लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली सेवानिवृत्त शिक्षकांनी महापालिका उपायुक्त, श्री.सचिन माने यांची भेट घेऊन आपल्या मागण्यांचे निवेदनही दिलेले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, फरकाची रक्कम अजूनपर्यंत अदा करण्यात आली नसल्याने बहुसंख्य सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक आर्थिकदृष्ट्या हवालदिल झाले आहेत, काही जण व्याधीग्रस्त असल्याने त्यांना वैद्यकीय उपचारासाठी उसनवारी करावी लागत आहे, इतकेच नव्हेतर दुर्दैवाने काही शिक्षकांचे निधन झाले असल्याने त्यांचे कुटुंब या वेतन फरकापासून वंचित राहिले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २००६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या ११२ शिक्षकांना ६ व्या वेतन आयोगातील ग्रॅच्युईटीची सुमारे १ कोटी रुपयांची रक्कम महापालिका प्रशासनाकडून आजपर्यंत मिळाली नाही. त्यामधील ३७ शिक्षकांचे निधन झाल्याने ते या हक्काच्या पैशांपासून वंचित राहिले आहेत, असा आरोप सेवानिवृत्त शिक्षक संघाचे अध्यक्ष श्री.सुधाकर भालेराव यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू सेवानिवृत्त शिक्षकांचे सेवानिवृत्ती वेतन तसेच वाढीव भत्ता व ७ व्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम सदरहू सेवानिवृत्त शिक्षकांना अदा करण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(६) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाच्या संदर्भात सखोल चौकशी करण्यात आली आहे काय व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०४-२०२४) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) अशा आशयाचे निवेदन महानगरपालिकेच्या स्तरावर प्राप्त झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेकडून प्राथमिक शिक्षक यांचे वेतन व सेवा निवृत्त शिक्षक यांचे निवृत्ती वेतन दरमहा १० तारखेच्या आत अदा करण्यात येते.

७ वा वेतन आयोग मंजूर करण्यात आला असून वेतनाच्या फरकाच्या रक्कमेचा ३ व ४ हफ्ता अदा करण्याअंतर्गत महानगरपालिका स्तरावरुन शिक्षण उपसंचालक, मुंबई यांच्याकडे पाठपुरावा केला जात असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**पालघर शहरातील कचरा उचलण्याचा कामामध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(४८) ७७३५१ (१७-०२-२०२४). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर नगरपरिषदेने शहरातील स्वच्छता राखण्यासाठी पूर्व व पश्चिम पट्ट्यासाठी स्वतंत्रपणे कचरा उचलण्याचा ठेका माहे मे, २०२३ पासून दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्वी कचरा ठेक्यावर होणारा १५ ते १७ लाख रुपयांचा खर्च आता ४६ ते ५० लाखांपर्यंत पोहोचला आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, पालघर शहरातील कचरा उचलण्याची कार्यक्षमता अभ्यासण्याबाबत पालघर नगरपरिषदेने दुर्लक्ष केल्याने ठेकेदाराने करदात्यांच्या पैशावर नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांच्या संगनमताने गैरव्यवहार केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने नगरपरिषदेच्या कर्मचारी व ठेकेदारांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०५-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) सन २०११ चे जनगणनेनुसार पालघर शहराची लोकसंख्या ६८९३० इतकी असून मालमत्तेची संख्या अंदाजे २८ ते ३० हजार इतकी होती. यापूर्वी सन २०१६-१७ मध्ये ५ वर्षाकरीता कचरा उचलण्याचा ठेका देण्यात आला होता. त्यावेळी कामगारांचे किमान वेतन प्रति दिन रु.५१७.८४/- प्रमाणे प्रति महा रु.१३,४६४/- इतके होते. सन २०२१-२२ या वर्षात शहराची लोकसंख्या, तसेच मालमत्तेची संख्या वाढल्याने घनकचरा व्यवस्थापन काम करण्यास यंत्रणा व कामगार अपुरे पडत असल्यामुळे गटार सफाई व जेसिबी डंपर पुरवठा करणे या ठेक्यातून अतिरीक्त मजुर व यंत्रणा उपलब्ध करुन घेऊन घनकचरा व्यवस्थापनाचे काम केले जात होते. पुर्वीच्या ठेक्यात घनकचरा व्यवस्थापन, गटार सफाई व अतिरीक्त गटार सफाई मजूर पुरवठा अशा सर्व बाबी अंतर्भूत असल्यामुळे प्रति माह रु.३८ ते ३९ लाख इतका खर्च येत होता.

सन २०२३-२४ या वर्षात शहराची लोकसंख्या वाढून अंदाजे ९० ते ९५ हजार इतकी झाली असून मालमत्तेची संख्या अंदाजे ३६ ते ४० हजार इतकी आहे. आताच्या ठेक्यात कामगार व यंत्रणेत दुप्पट वाढ झाली असून गटार सफाई करण्याचे काम देखील अंतर्भुत आहे. तसेच कामगारांचे किमान वेतन प्रति दिन रु.९३९/- प्रमाणे प्रति माह रु.२४,४१४/- इतके आहे. सदरचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असून सर्वसाधारण सभेने सर्वानुमते त्यास मंजूरी दिली आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी देतांना जीएसटी दर अंतर्भुत केले आहे. सदर ठेक्यामध्ये पुर्व व पश्चिम भाग अंतर्भुत असल्याने ठेक्याची रक्कम प्रति माह रु.५२,१५,४८६/- इतकी झाली आहे. कचरा उचलण्याच्या ठेक्यामध्ये कोणताही गैरव्यवहार झालेला नाही.

याप्रकरणी मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल करण्यात आली असून त्यामध्ये मा.न्यायालयाने नगरपरिषदेच्या बाजूने निर्णय दिलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिडको महामंडळात सहायक जनसंपर्क अधिकारी यांची कंत्राटी स्वरुपात बेकायदेशीर नियुक्ती केल्याबाबत

**(४९) ७८२५८ (१७-०२-२०२४). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिडको महामंडळात सहाय्यक जनसंपर्क अधिकारी पदावर कार्यरत असताना जात वैधता प्रमाणपत्र बोगस दाखल केल्याप्रकरणी श्री.मोहन निनावे यांना सेवेतून बडतर्फ करुन सेवेदरम्यान सिडकोकडून घेतलेले वेतन वसूल करण्याचे आदेश तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांनी दिले होते, हे खरे आहे काय,
(२) तसेच श्री.निनावे यांना सिडको महामंडळात कंत्राटी स्वरूपात वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी पदावर सेवेत घेण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बेकायदेशीर नियुक्ती करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०५-२०२४) :** (१), (२) व (३) श्री.मोहन निनावे यांची "वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी" पदावर अनुसूचित जमाती या प्रवर्गातून सिडको महामंडळामध्ये दि.१५.१.१९९६ रोजी नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी विहित कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने त्यांना सिडकोमार्फत नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. त्याविरोधात त्यांनी मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे रिट याचिका क्र.७१३०/२०१६ दाखल केली होती. सदर याचिकेमधील मा.न्यायालयाच्या दि.१८.१.२०१७ च्या आदेशाच्या अनुषंगाने जात वैधता समिती, नागपूर यांनी तपासणीअंती श्री.निनावे यांनी अनुसूचित जमातीचा दाखल केलेला दावा अवैध ठरविला. त्यानुषंगाने सिडको महामंडळाच्या सेवेतून श्री.निनावे यांना दि.७.९.२०१८ रोजी सेवामुक्त करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि.२१.१२.२०१९ अन्वये श्री.निनावे यांची वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी या पदावर तात्पुरत्या स्वरुपात दि.२५.१०.२०२३ पासून ११ महिन्यांकरीता किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अधिसंख्य पदावर नेमणूक करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुडाळ नगरपंचायत (जि.सिंधुदुर्ग) क्षेत्रातील इंद्रप्रस्थनगर येथील**
**नैसर्गिक प्रवाहास अडथळा निर्माण केल्याबाबत**

**(५०) ७९३१४ (०६-०२-२०२४). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुडाळ नगरपंचायत (जि.सिंधुदुर्ग) क्षेत्रातील इंद्रप्रस्थनगर येथील पावसाचे पाणी वाहून जाणाऱ्या नैसर्गिक प्रवाहात सिमेंटक्रॉक्रीट पाईप टाकून अतिक्रमण करुन नैसर्गिक प्रवाहास अडथळा निर्माण केल्याप्रकरणी श्री.आनंद वेंगुर्लेकर यांना कुडाळ नगरपरिषदेने दिनांक ८ जून, २०२३ रोजी तातडीने सदर नैसर्गिक प्रवाहातील अडथळा दूर करण्यात यावा अशी नोटीस देऊन नैसर्गिक प्रवाहातील अडथळा तात्काळ दूर न केल्यास फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल अशी सुचना देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित व्यक्तिने अद्यापही पावसाचे पाणी वाहून जाणाऱ्या नैसर्गिक प्रवाहातील अडथळा दूर केलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त नोटीसीच्या अनुषंगाने नैसर्गिक प्रवाहातील अडथळा दूर करण्यास टाळाटाळ करणाऱ्यावर संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) पावसाचे पाणी वाहून जाणाऱ्या नैसर्गिक प्रवाहातील अडथळा संबंधित व्यक्तीने दूर केला असल्याने याप्रकरणी संबंधिताविरुध्द गुन्हा दाखल केला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.